# कविता...

अस्फुट भावनांच्या लेखी, मन बोले काही अंतरी का?
अंतरीचे अल्लड अलगद, नकळत उलगडते ती कविता ॥ १ ॥

कधी दरवळे गंध तिच्यातून, कधी खोल स्मृतींचा पाणवठा
शब्दात माळूनी प्रसंग सारा, ती सहज अवतरते कविता ॥ २ ॥

कधी लेई अलंकार पदर, कधी थेट निर्भीड आवेश सारा
पाषाणही मग विरघळती, पाहून रसायन ती कविता ॥ ३ ॥

कधी सांजेचे प्रेम बहरते, कधी सूर विरह करुणेचा,
नकळत खट्याळ हास्य फुलवी, कधी देशप्रेम अंगार कविता ॥ ४ ॥

कमी शब्द अन रम्य कल्पना, नको अधिक सायास कशाचा
व्यक्त होण्या फक्त हवे, जागृत भाव सालस त्या कविता ॥ ५ ॥

सूर वेणूचे झंकारती, वर्णिती पाखरे अन रान वारा
संगीतास ये आर्जव, पाहून लय छंद बद्ध ती कविता ॥ ६ ॥

स्वप्न सुरेख मांडते, अनुभव विवरण करी स्पष्ट्सा
व्यक्त करते इतरांस, ज्यास न शब्द सुचती, ती कविता ॥ ७ ॥

© सचिन पु. कुलकर्णी
www.saarthbodh.com
FB ID - sachin kulkarni78